टाइम्स

रविवार, दि. ५ फेब्रुवारी २०२३

# उड़ाण महोत्सवातील पथनाट्य स्पर्धेत श्री पंचम खेमराज महाविद्यालय प्रथम

दोडामार्ग, ४ फेब्रु. (प्रतिनिधी) - येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात गुरुवार दि. २ फेब्रुवारी २०२३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा 'उडाण द फ्लाईट ऑफ एक्सटेन्शन २०२३' उत्साहात संपन्न झाला.

या महोत्सवात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १४ महाविद्यालयांनी विविध सामाजिक विषयांवर आधारित पथनाट्य, भित्तिचित्रे, सृजनशील लेखन व वक्तृत्व स्पर्धामधून सहभाग नोंदवला. त्यामध्ये पथनाट्य स्पर्धेत श्री. पंचम खेमराज महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय क्रमांक संत राऊळ महाराज महाविद्यालय व तृतीय क्रमांक प्रमोद रविंद्र धुरी अध्यापक महाविद्यालय यांनी मिळवला. तर या स्पर्धेतील उत्तेजनार्थ पारितोषिक संयुक्तपणे यशवंतराव भोसले कॉलेज ऑफ फार्मसी व जयहिंद कॉलेज ऑफ सायन्स यांनी मिळवली. पथनाट्य स्पर्धेचे परिक्षण मुंबई विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक व सिनेअभिनेते डॉ. विश्वंभर जाधव व प्रा. डॉ. विंदा मांजरामकर यांनी केले

भित्तिचित्रे स्पर्धेचे प्रथम पारितोषिक देशभक्त शंकरराव गव्हाणकर कॉलेज, द्वितीय पारितोषिक जयहिंद कॉलेज ऑफ सायन्स तर तृतीय पारितोषिक संयुक्तपणे संत राऊळ महाराज महाविद्यालय व डॉ. विलासराव देसाई कॉलेज, पाट यांनी मिळवली. सृजनशील लेखन स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्रमोद रविंद्र धुरी अध्यापक महाविद्यालय, द्वितीय पारितोषिक लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय, तृतीय पारितोषिक आम दार दीपकभाई केसरकर, महाविद्यालय तर उत्तेजनार्थ पारितोषिक संत राऊळ महाराज महाविद्यालयाने पटकावली.

वक्तृत्व स्पर्धेचे प्रथम पारितोषिक देशभक्त शंकर गव्हाणकर कॉलेज तर द्वितीय व तृतीय पारितोषिके अनुक्रमे लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय व श्री. पंचम खेमराज महाविद्यालयाने मिळवले. सर्व विजयी महाविद्यालयांना पारितोषिक वितरण समारंभात आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक डॉ. कुणाल जाधव यांच्याहस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी यावेळी सर्व सहभागी महाविद्यालयांचे अभिनंदन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी




मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या 'उडाण द फ्लाईट ऑफ एक्सटेन्शन २०२३' मध्ये सहभागी झालेले महाविद्यालयीन विद्यार्थी.